**<u>पिजीए क्र. ६१/२०२५</u>    <u>पान क्र. ०६</u>    <u>नि. क्र. सी—५</u>**

**<u>गैरअर्जदार क्र. ०१ ते ०३ तर्फे साक्षीदार क्र. ०१ चा शपथेवर पुढील सरतपास ॲड. आर. ए. संघवी गैरअर्जदार क्र. ०१ ते ०३ तर्फे</u> :—**

१०. शपथपत्र सी—५ मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. आता मला मी प्रकरणात दाखल कागदपत्रांची यादी नि. सी—४ सोबत अनुक्रमांक ०१ ते ०३ वर मी उपदान अधिनियम मधिल उपदान अधिनियम पुस्तकाचे कलम २ ची प्रत व अनु. क्र. २ वर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती नियमाची नियम १११ ची प्रत व अनु. क्र. ३ वर महाराष्ट्र शासनाने पारीत केलेला शासन निर्णय दि. ०१/०३/२०१९ ची प्रत सादर केली आहे. अनुक्रमांक ०१ ते ०३ वरील दस्ता संदर्भाने अर्जदाराचे वकीलांना कोणतीही हरकत नसल्याने त्यास अनुक्रमे **नि. सी—६ ते सी—८** देण्यात आली.

पुढील सरतपास पुर्ण.

**उलटपास अर्जदारातर्फे अधिवक्ता श्री राठी यांचे मार्फत :—**

११. हे म्हणने खरे आहे की अर्जदार हा जिल्हा परिषद चे सेवेमध्ये होता. हे म्हणने खरे आहे की अर्जदार सेवानिवृत्त होईपर्यंत सतत नोकरीवर हजर होता. अर्जदाराचे शेवटचे पगार प्रमाणपत्र अभिलेखावर सादर केले आहे. हे म्हणने खरे आहे की शेवटचे पगार प्रमाणपत्राबाबत कोणताही वाद नाही.

१२. हे म्हणने खरे आहे की जिल्हा परिषद ने केंद्र शासनाकडून उपदान अधिनियम कलम ५ प्रमाणे कोणतीही सुट

दिलेली नाही. हे म्हणने खरे नाही की अर्जदाराला उपदान प्रदान अधिनियम १९७२ च्या तरतुदी लागू आहेत. हे म्हणने खरे आहे की अर्जदाराला महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती अधिनियमाप्रमाणे उपदानाची रक्कम मोजनी करून अर्जदाराला दिलेली आहे. हे म्हणने खरे आहे की उपदानाची गणना ही उपदान प्रदान अधिनियम १९७२ प्रमाणे करण्यात आलेली नाही. हे म्हणने खरे आहे की अर्जदाराला उपदानाची गणना करतांना कोणतीही नोटिस देण्यात आलेली नाही.

१३. हे मला माहिती नाही की अर्जदाराने गैरअर्जदाराचे कार्यालयात येवून वेळोवेळी उपदानाच्या फरकाची मागणी केलेली होती. हे म्हणने खरे नाही की अर्जदार हा उपदान प्रदान अधिनियम १९७२ च्या फरकानुसार रक्कम मिळण्यास पात्र आहे. हे म्हणने खरे नाही की अर्जदाराला महा. नागरी सेवा निवृत्ती वेतन अधिनियम हा उपदानाबाबत लागू नाही. हे म्हणने खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

माझे समक्ष

स्वा/—

(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. २२.०४.२०२६.